तपासी अंमलदार





# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 154 Cr.P.C.)

प्रथम खबर अहवाल

(फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये)

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S. (पोलीस ठाणे):** कोतवाली **Year (वर्ष):** 2022

   **FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0300 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 22/04/2022 17:10 वाजता

2. | S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
   |---|---|---|
   | 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

   1 **Day (दिवस):** शुक्रवार **Date from (दिनांक पासून):** 22/04/2022 **Date To (दिनांक पर्यंत):** 22/04/2022

   **Time Period (कालावधी):** प्रहर ६ **Time From (वेळेपासून):** 16:25 तास **Time To (वेळेपर्यंत):** 17:10 तास

   (b) **Date of Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा दिनांक):** 23/04/2022 **Time (वेळ):** 01:23 तास

   (c) **General Diary Reference No. (सर्वसाधारण रोजनिशीचा संदर्भ क्रमांक):** 004 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 23/04/2022 01:16 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

   1. (a) **Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्यापासून दिशा आणि अंतर):** दक्षिण, 3 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

      (b) **Address (पत्ता):** महात्मा फूले चौक मार्केयार्ड अ,

      (c) **In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, त्या पोलीस ठाण्याचे नाव):** कोतवाली

      **District (State) (जिल्हा (राज्य)):** अहमदनगर (महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

   (a) **Name (नाव):** युवराज विठ्ठल पळसकर विठ्ठल पळसकर पळसकर

   (b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**



Scanned with CamScanner

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1988 (d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदार कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता): |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | टाकळी लोणार, ताश्रीगोंदा, जि, नेवासा, अहमदनगर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | टाकळी लोणार, ताश्रीगोंदा, जि, कोतवाली, अहमदनगर, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.):

7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | महेश गोविंद महाडुळे गोविंद महाडुळे | | | 1. Town/Village (शहर / गाव): सारसनगर,अहमदनगर, Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): कोतवाली,District (जिल्हा): अहमदनगर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):



Scanned with CamScanner

| S. No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 3,50,000/ रु. | 3,50,000.00 |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**
3,50,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र., जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (अकस्मात मृत्यू प्रकरण क्रं.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

मी युवराज विठ्ठल पळसकर, वय 34 वर्षे, धंदा षेती, रा. टाकळी लोणार, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहण्यास असुन शेती व्यवसाय करतो. मी दि.21/4/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर येथे पोलीस उपअधीक्षक श्री खेडकर यांची त्यांचे कार्यालयीन कक्षात समक्ष भेट घेवुन त्यांना माझे वरील प्रमाणे नांव, पत्ता व ओळख सांगुन माझी एका लोकसेवका विरूध्द लाचेची तक्रार असल्याचे सांगितले. त्यावेळी पोउपअधि श्री. खेडकर यांनी कार्यालयात गोपनिय कामकाजा करीता हजर असलेले जिल्हा हिवताप कार्यालयातील पंच श्री. रामेश्वर डोईफोडे व श्री प्रकाश शिंदे व कार्यालयातील स्टाफ यांना त्यांचे कक्षात बोलावुन घेतले. त्यांची व माझी आपसात ओळख करून दिली. त्यानंतर पोउपअधि श्री.खेडकर यांचे सुचनेप्रमाणे पंचांनी मला माझे नांव पत्ता विचारून तक्रार विचारली असता, मी वरील प्रमाणे नांव पत्ता सांगुन माझी तक्रार सांगितली कि, आमच्या टाकळी लोणार या गावी भैरवनाथ वि.का.सेवा सोसायटी आहे. त्या सोसायटीचे तत्कालीन सचिव श्री.सुभाश निवृत्ती निकम यांच्याविरूध्द आम्ही बेकायदेषीर कर्जमाफी, धारण क्षेत्रापेक्षा जादा कर्ज वाटप, नावावर क्षेत्र नसताना कर्ज वाटप, इकरार न नोंदविता कर्ज वाटप या तक्रारी आम्ही श्री.दिग्विजय आहेर, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अहमदनगर यांच्याकडे केल्या होत्या. त्या तक्रारीच्या अनुशंगाने श्री. आहेर यांनी निकम यास दि.10/08/2021 पासुन सेवेतुन निलंबित केले आहे.मागील आठवडयात उपनिबंधक कार्यालयातील कर्मचा यांच्या चर्चेतुन समजले की श्री.आहेर हे सचिव निकम यास निलंबनातुन मुक्त करून पुन्हा सेवेत घेण्याचे आदेष काढणार आहेत. मिळालेल्या माहितीच्या आधारे मी स्वतः उपनिबंधक कार्यालयात येवुन वरिल विशयासंदर्भात माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता मला आमचे षेजारील गावातील माझ्या ओळखीचे श्री.महेष महांडुळे भेटले. ते नेहमी उपनिबंधक कार्यालयात येत जात असतात. त्यामुळे मी त्यांना अगोदरपासुन ओळखत आहे. त्यांनी मला कषासाठी आला आहेस याबाबत विचारले असता त्यांना मी सचिव निकम यांच्या कामासंबंधात उपनिबंधक कार्यालयात आलो असल्याचे सांगितले. त्यावर त्यांनी मला सांगितले की, "माझी व उपनिबंधक श्री.आहेर यांची चांगली ओळख आहे. मला तुमच्या कामासंदर्भात सर्व माहिती आहे. श्री.आहेर यांनी निकम यांच्या बडतर्फीचे आदेष काढायचे असतील तर तुमच्या कडुन चार लाख रूपये ( 4,00,000/-रु.) घेण्यास सांगितले आहेत. मी त्यांना सांगितले की, मी पैसे आणले नाहीत तसेच इतर सहका यांषी चर्चा केलेली नाही. मी चर्चा करून आपणास पुन्हा भेटण्यास येईल त्यावेळी तुम्ही माझी उपनिबंधक साहेब यांचेषी भेट घालुन दया असे कळविले आहे. श्री.दिग्विजय आहेर साहेबांना मी यापुर्वी कधी समक्ष भेटलेलो नाही.तसेच त्यांनी माझ्याकडे कधी लाचेची मागणी केली नाही.



Scanned with CamScanner

आज मी जिल्हा उपनिबंधक कार्यालयात जावुन श्री. महांडुळे यांची भेट घेणार आहे. श्री.महांडुळे यांनी जर उपनिबंधक श्री. आहेर यांचेषी माझी भेट घालुन दिली तर त्यांनाही भेटणार आहे. श्री. आहेर यांनी तत्कालीन सचिव श्री. निकम यांचे बडतर्फीचे आदेष काढण्याकरीता माझ्याकडे स्वतः लाचेची मागणी केल्यास त्यांच्या विरूध्द कायदेषीर कारवाई करावी किंवा श्री.महांडुळे यांनी एकटयानेच श्री.आहेर यांच्या नावाने लाचेची मागणी केल्यास श्री.महांडुळे यांचे विरूध्द कायदेषीर कारवाई करावी अशी माझी तक्रार सांगितली. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री खेडकर यांनी दिले सुचेने प्रमाणे मी माझी वरील तक्रार माझे स्वहस्ताक्षरात लिहून दिली. त्यावर मी सही केली.

त्यानंतर मी श्री महांडुळे व श्री आहेर यांचे विरूध्द नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. पो.उपअधीक्षक श्री खेडकर यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याचा वापराबाबत माहिती समजावून सांगितली. त्यानंतर पो.उपअधीक्षक श्री खेडकर यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या.

खाजगी इसम महांडुळे व श्री आहेर हे जिल्हा उपनिबंधक कार्यालय, अहमदनगर येथे आहेत अगर कसे ? याची खात्री करण्यासाठी मी माझे मोबाइल फोन क्र.7798241716 वरुन महांडुळे यांचे फोन क्र.9130951859 फोनवर फोन करुन दहा मिनिटांत आलो असे मी त्यांना सांगितले. त्यानंतर पो.उपअधीक्षक श्री खेडकर यांनी मला व पंच नं.1 यांना माझेकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन श्री.महांडुळे यांची भेट घेण्यासाठी माझेकडील मो.सा.क्र.एमएच-16-एडब्ल्यु-5876 वरुन रवाना केले. त्याप्रमाणे आम्ही रवाना होवून जिल्हा उपनिबंधक कार्यालय, अहमदनगर येथील तिसÚया मजल्यावरील कार्यालयात गेलो. बराच वेळ महांडुळे हे सदर कार्यालयात आले नाही. दरम्यान मी त्यांना दोन वेळा माझे मोबाइल फोनवरुन फोन केला. थोडया वेळानंतर महांडुळे यांनी मला फोन करुन कार्यालयाचे समोरील हायवे रोडवर त्यांचे चारचाकी वाहनांकडे येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी व पंच नं.1 असे तिथे जावून त्यांचे वाहनांत जावून बसलो. तेथे माझेत व महांडुळे यांचेत सचिव निकम यांचे बडतर्फीचे आदेष काढण्याचे संबंधाने चर्चा झाली. त्यादरम्यान महांडुळे यांनी माझेकडे सचिव निकम यांचे बडतर्फीचे आदेष काढण्याकरीता जिल्हा उपनिबंधक श्री. आहेर यांचेकरीता म्हणुन 4,00,000/- रू. लाचेची मागणी केली. मी महांडुळे यांना 4,00,000/-रुपये ही जास्त रक्कम असल्यामुळे रक्कम जुळवाजुळव करण्यासाठी वेळ दया असे म्हणालो व रकमेची जुळवाजुळव करून उदया येतो असे सांगून तेथून निघुन लाप्रवि कार्यालयात परत आलो. त्यानंतर पो.उपअधीक्षक श्री खेडकर यांनी मला व पंच नं.1 यांना घडले हकीकती बददल विचारता आम्ही सविस्तर हकीकत सांगितली. त्यानंतर पो.उपअधीक्षक श्री खेडकर यांनी दोन्ही पंचासमक्ष व्हाईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकुन ते मी व पंच नं.1 यांनी सांगितले हकीकती प्रमाणे असल्याची खात्री करून त्याची स्क्रिप्ट तयार केली. सदरच्या संभाषणावरुन खाजगी इसम महांडुळे यांनी आमचे टाकळी लोणार गावातील भैरवनाथ वि.का.सेवा सोसायटीचे तत्कालीन सचिव श्री.सुभाश निवृती निकम बडतर्फीचे आदेष काढण्याचे मोबदल्यात जिल्हा उपनिबंधक श्री.आहेर यांचेकरीता म्हणुन माझेकडे पंच नं.1 यांचेसमक्ष स्पष्टपणे 4,00,000/- रू. लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

दरम्यान माझे मोबाईल फोनवर खाजगी इसम महांडुळे यांचा फोन आला होता, तो माझेकडुन रिसीव्ह केला गेला नाही. त्यानंतर पो.उप अधी.श्री.खेडकर यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझे मोबाईल फोनवरून खाजगी इसम महांडुळे यांचे 9130951859 या नंबरवर फोन करून फोनचा स्पिकर चालु करून बोलणे केले. त्यामध्ये मी त्यांना एवढे पैसे जमवायला वेळ लागेल. षुक्रवारी ( दि.22/4/2022 रोजी ) बारा वाजेपर्यंत पैसे घेवुन येतो असे सांगितले. त्यामुळे खाजगी इसम महांडुळे यांचेविरूध्दची दि.21/4/2022 रोजीची सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करून, श्री महांडुळे यांचेविरुध्द दि.22/4/2022 रोजी लाचेचा सापळा आयोजित करण्याचे सर्वानुमते ठरले. पो.उपअधीक्षक श्री खेडकर यांनी मला, दोन्ही पंचांना व स्टाफला झाले कारवाई बाबत गोपनीयता



Scanned with CamScanner

राखणेबाबत सुचना देवून, दि.22/4/2022 रोजी सकाळी 10/00 वा कार्यालयात हजर राहण्यास सांगितले. त्यानंतर मी दि.22/4/2022 रोजी ला.प्र.वि.कार्यालयात हजर झालेनंतर पो.उपअधीक्षक श्री खेडकर यांनी श्री महांडुळे यांनी दि.21/4/2022 रोजी मागणी केलेली लाचेची रक्कम 4,00,000/- रु. हजर करण्यास सांगितली असता मी माझेकडे 2,55,000/- रु. आहेत असे सांगितले. लाचेची रक्कम मोठी असल्याने व उर्वरित रक्कम 95,000/- रु. तक्रारदार यांना तात्काळ उपलब्ध करणे शक्य नसल्याने सापळा कारवाई करीता 95,000/- रु. डमी रक्कम वापरण्याचे सर्वानुमते ठरले असे एकुण 3,50,000/- लाचेची रक्कम जमा करण्यात आली. त्या दरम्यान माझे मोबाइलवर महांडुळे यांचा फोन आला व त्यांनी कुठे आहेत ? याबाबत विचारणा केली असता मी कायनेटिक चौकाजवळ असून ॲक्सिस बँकेत पैसे काढण्यासाठी जात आहे असे सांगून साडे चार पर्यंत तुम्ही सांगाल तेथे येतो असे सांगितल्याने, महांडुळे यांनी मला काम झाले नंतर फोन करण्यास सांगितले. सदरचा कॉल ध्वनीमुद्रित करण्यात आला.

त्यानंतर पो.उपअधीक्षक श्री खेडकर यांनी ॲन्थ्रासिन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहीती दिली. मी हजर केलेल्या नोटांना पोना चौधरी यांनी ॲन्थ्रासिन पावडर लावली व नोटांचे बंडल एकत्रित एका कापडी पिशवीत ठेवून ती माझे ताब्यात दिली. तसेच त्यानंतर मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकाला सापळा कारवाई दरम्यान करावयाचे कारवाई बाबत सुचना देण्यात आल्या व सर्व कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्याबाबतचा सविस्तर पंचनामा कार्यालयातील संगणकावर टंकलिखीत करण्यात आला.

त्यानंतर पो.उपअधीक्षक यांचे सुचनेवरुन मी दोन्ही पंचासमक्ष महांडुळे यांना त्यांचे मोबाइल फोनवर माझे मोबाइल फोनवरुन संपर्क करुन माझे फोनचा स्पिकर चालू करुन बोलणे केले, त्यामध्ये महांडुळे यांनी ते कल्याण बायपास येथे असल्याचे सांगितले. त्यावर त्यांनी मला कुठे आहे असे विचारता मी ॲक्सिस बँक, स्वास्तिक चौक येथे असल्याचे सांगितले. त्यानंतर महांडुळे यांचेविरुध्द सर्वानुमते स्वास्तिक चौक, अहमदनगर येथे लाचेचा सापळा आयोजित करण्याचे ठरले.

त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालू करुन माझेकडे दिले आणि मला व पंच नं.1 यांना .महांडुळे यांची भेट घेण्यासाठी स्वास्तिक चौक, अहमदनगर येथे माझेकडील दुचाकी वाहनांवरुन रवाना केले. पाठोपाठ पो.उपअधीक्षक श्री खेडकर,पंच नं.2 हे सरकारी वाहनाने व सापळा पथकातील कर्मचारी हे आपआपल्या दुचाकी वाहनांवरुन येवून स्वास्तिक चौकातील हॉटेल जिजाई चे आजु बाजुस सापळा लावुन थांबले. त्यानंतर काही वेळाने महांडुळे तेथे आले. तेथे चर्चा झालेनंतर महांडुळे यांनी मला आपल्याला ऑफिसमध्ये जायचे आहे, तुम्ही माझे गाडीचे पाठीमागे या असे म्हणून महांडुळे त्यांच्या चारचाकी वाहनाकडे चालत गेले. त्यांचे पाठोपाठ मी व पंच नं.1 असे आमचेकडील दुचाकी वाहनांवर गेलो. आमचे पाठोपाठ पो.उपअधीक्षक श्री खेडकर व सापळा पथकातील अधिकारी कर्मचारी असे त्यांचेकडील वाहनांनी आले. महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड येथे रस्त्याचे बाजुला स्टॅम्प विक्रीच्या गाळया समोर गाडी उभी करुन महांडुळे गाडीतून खाली उतरले, त्यावेळी आम्ही आमची दुचाकी गाडी त्यांचे जवळ थांबविली व खाली उतरलो, पाठोपाठ सापळा पथक आल्याची खात्री केली. त्यानंतर महांडुळे यांनी मला लाचेची रक्कम सदर गाळयातील इसमाकडे देण्यास सांगितली असता मी त्यांना नकार दिला. त्यावेळी महांडुळे हे मला व पंच नं.1 अशांना त्या गाळयात घेवून गेले व किती रक्कम आहे ? असे विचारले. मी त्यांना साडे तीन लाख रुपये आहेत असे म्हणुन मोजुन घ्या असे म्हणालो. त्यावर महांडुळे यांनी आणखी पंचवीस हजार रुपये द्यावेच लागतील असे म्हणुन माझे हातातून लाचेच्या नोटा ठेवलेली पिशवी घेवून गाळयातील टेबलच्या खाली ठेवून दिली. त्यानंतर मी, पंच नं.1 आणि महांडुळे असे त्या गाळयाचे बाहेर आलो. त्यानंतर मी सापळा पथकास लाच स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला. त्यावेळी सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी महांडुळे यांना पकडले व माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद केले. त्यानंतर पो.उपअधीक्षक श्री खेडकर यांनी पंच नं.1 यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली व कोठे ठेवली असे विचारले असता, पंच नं.1 यांनी समोरील इसमाकडे बोट दाखवून

Scanned with CamScanner

हेच ते महांडुळे असून त्यांनी लाचेची रक्कम स्विकारुन समोरील गाळयातील टेबलच्या खाली ठेवली असल्याचे सांगितले.

त्यावेळी पो.उपअधीक्षक श्री खेडकर यांनी महांडुळे यांना परिचय करुन देवून लाचेच्या रकमे संदर्भात विचारणा केली असता त्यांनी लाचेची रक्कम स्विकारुन समोरील गाळयातील टेबलच्या खाली ठेवली असल्याचे सांगितले. महांडुळे यांचा उजवा हात मनगटाजवळ पो.अंमलदार निमसे यांनी व डावा हात पो.अंमलदार चौधरी यांनी पकडला. शब्द संख्या जास्त आसल्याने सोबत मूळ फिर्याद जोडलेली आहे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** SAMPATRAO SAKHARAM SHINDE(पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**
**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):** **or (किंवा)**

(4) **On point of jurisdiction, If F.I.R. Transferred to P.S. (अधिकारितेच्या मुददयावर प्रथम खबर हस्तांतरीत केला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C.**
**(आर.ओ.ए.सी.)**

14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

नितीन अशोक गाडगे
पो.हे.कॉ./५००
[stamp] अहमदनगर

Name (नाव): SAMPATRAO SAKHARAM SHINDE

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.): POBN60370

Scanned with CamScanner